# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ / चैत्र ३, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | उप मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री | |
| (३) | शालेय शिक्षण मंत्री | |
| (४) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | |
| (५) | पणन, राजशिष्टाचार मंत्री | |
| (६) | क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री | |
| (७) | अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | |
| (८) | वस्त्रोद्योग मंत्री | |
| (९) | सहकार मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २६**

---

### 'डी-फार्मसी' (औषधनिर्माणशास्त्र) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र व परवाना देण्याबाबत

**(१) * ४३८३ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२३-२०२४ मध्ये ‘डी-फार्मसी’ अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि परवाना मिळण्यासाठी ‘एक्झिट’ परिक्षा बंधनकारक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहा महिने होऊनही परिक्षा झाली नसल्याने 'डी-फार्मसी' पदविका प्रमाणपत्र व परवाना देण्यात आला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील ‘एक्झिट’ परिक्षा तातडीने घेऊन 'डी.फार्मसी' अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र व परवाना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय) या शिखर परिषदेने दिनांक २४.२.२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पदविका धारक विद्यार्थ्यांना राज्य फार्मसी कौन्सिलकडे फार्मासिस्ट म्हणून (परवाना करीता) नोंदणी करण्यापूर्वी डिप्लोमा इन फार्मसी “एक्झिट एक्झामिनेशन” ही परीक्षा देणे आवश्यक केले आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत असून प्रमाणपत्राकरीता “एक्झिट” परीक्षा बंधनकारक करण्यात आलेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे विहीत कालबध्द कार्यक्रमानुसार औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाकरीता प्रवेशित विद्यार्थ्यांची परिक्षा घेऊन, संबंधितांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांसाठी पीसीआयद्वारे एक्झिट एक्झामिनेशन दि. ३,४ व ५ ऑक्टोबर २०२४ रोजी नियोजित केलेली होती. या परिक्षेच्या योजनेसंदर्भात केलेल्या बदलास केंद्रिय आरोग्य मंत्रालयाची मान्यता प्रलंबित असल्याने या नियोजित परिक्षा पुढे ढकलत असल्याचे पीसीआय यांनी दि. २७.०९.२०२४ च्या परिपत्रकाद्वारे सर्व संबधिताना कळविले आहे.

(३) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची परिक्षा व प्रमाणपत्र वितरणाचे काम कालबध्द वेळापत्रकानुसार सुरु आहे. एक्झिट एक्झामिनेशन परिक्षेचे नियोजन व अंमलबजावणी याची सर्व जबाबदारी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या शिखर परिषदेची आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे दि.३१.१२.२०२४ रोजीचे परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणून नोंदणीचे एका वर्षासाठीचे प्रमाणपत्र (एक्झिट एक्झामिनेशनचे आयोजन होईपर्यंत) देण्याबद्दल निर्देश पीसीआयद्वारे देण्यात आले आहेत. तदनंतर एक्झिट एक्झामिनेशन उत्तीर्ण होईपर्यंत नोंदणीचे प्रमाणपत्र नुतनीकरण न करण्याचे यात नमुद आहे. याकरिता विद्यार्थ्यांनी पीसीआयद्वारे निर्धारित केलेल्या नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विद्याविहार येथील सोमय्या शैक्षणिक संकुलातील महाविद्यालयांमध्ये गुणपत्रिकेत झालेला गैरव्यवहार

**(२) * ४८५८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विद्याविहार येथील सोमय्या शैक्षणिक संकुलातील के.जे.सोमय्या आर्टस् कॉमर्स कॉलेज, एस.के. सोमय्या कॉलेज तसेच विनय मंदिर ज्युनिअर कॉलेज महाविद्यालयांमधील ५० विद्यार्थ्यांनी बनावट गुणपत्रिका आणि कागदपत्रांच्या आधारे इयत्ता ११ वी मध्ये बेकायदा प्रवेश मिळविल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत १० ते ४० टक्के इतकी वाढ करुन एका विद्यार्थीनीला ५२ टक्के गुण मिळाले असताना ९३ टक्के गुण दाखवून बनावट गुणपत्रिका तयार करण्यात आल्या असून त्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील लिपिकाने प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रु. ५० हजार ते दीड लाख इतकी रक्कम घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी कार्यवाही करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले असून याबाबत टिळक नगर पोलीस ठाण्यात दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास ६ जणांविरुद्ध पोलीसांनी गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, एस. के. सोमय्या विनय मंदिर हायस्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज, के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, विद्याविहार, मुंबई या महाविद्यालयात बनावट गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला सादर करुन विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी मध्ये बेकायदा प्रवेश मिळविल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) (१) संबंधित प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्या कर्मचा-यास संस्थेने निलंबीत केले आहे.

(२) सदर प्रकरणामध्ये टिळकनगर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता २०२३ व माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयामध्ये एकूण १० आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याविरोधात मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विक्रोळी, मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील खातेदार आणि गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत**

**(३) * २९११ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या तत्कालीन संचालकांनी लेखा परीक्षकासोबत संगनमत करून रुपये ६५१ कोटी इतक्या रकमेचा अपहार केल्याने सुमारे २ लाख खातेदारांची फसवणूक झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ॲक्ट, १९९९ च्या अंतर्गत स्थापन केलेल्या समितीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी ईडीमार्फत काही रकमेची वसुली करण्यात आली, परंतु अद्यापही मोठया प्रमाणात रक्कम वसूल होणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने दोषींवर कारवाई करणेबाबत तसेच खातेदारांची उर्वरित रक्कम तातडीने वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पेण अर्बन को-ऑप. बँक लि. पेण या बँकेमध्ये रक्कम रु. ५९७.२१ कोटीचा अपहार झाल्याचे सन २०१० मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९ कलम ४(१) आणि कलम ५ (१) अन्वये सदर मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, पेण यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९ चे अंतर्गत बँकेच्या ठेवीतून खरेदी केलेल्या एकूण ४७ मिळकती दि. २४.०७.२०१३ रोजी जप्त केल्या आहेत. तसेच बँकेच्या निधीतून खरेदी केलेल्या उर्वरित ८ मालमत्ता व संचालकांच्या ९६ मालमत्ता दि. २१.०६.२०१८ रोजी जप्त केल्या आहेत. सक्षम प्राधिकारी यांनी मा. विशेष सत्र न्यायालय, रायगड अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल केस नं.(१/२०११) मध्ये जप्तीचा आदेश स्थायी व अंतिम करण्यासाठी अर्ज व प्रतिज्ञापत्र दाखल केले असून दि. १७.०२.२०१४ रोजी जप्त केलेल्या ३१ मालमत्तांवरील जप्तीचा आदेश कायम करण्यात आला आहे.
(३) सक्त वसुली संचालनालय, मुंबई यांचेकडून बँकेच्या पैशातून खरेदी केलेल्या मिळकतींवर नोंद करण्यात आलेला बोजा कमी करुन सदर मिळकती सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडे कागदोपत्री ताब्यात देण्यात आल्या असून अद्याप कोणतीही रक्कम सक्षम प्राधिकारी अथवा बँकेकडे वर्ग करण्यात आलेली नाही.
(४) भारतीय रिझर्व्ह बँकेने दि पेण अर्बन को-ऑप बँकेचा परवाना रद्द केला असला तरी सदर बँकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ट असल्याने सदर बँक अवसायनात घेण्याची प्रक्रीया अद्याप होऊ शकलेली नाही. तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने पेण अर्बन बँकेवर लागू केलेल्या आर्थिक निर्बंधामुळे ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करता येत नाहीत.

सदर प्रकरणाबाबत सुमारे १.४४ लाख ठेवीदारांचा विचार करता विशेष बाब म्हणून ठेवीदारांच्या विमा संरक्षित रक्कमा तातडीने अदा करणेबाबत भारतीय रिझर्व्ह बँक तसेच डी.आय.सी.जी.सी. ला आवश्यक ते निर्देश देणेबाबत मा. केंद्रीय राज्य मंत्री (वित्त) यांना मा. मंत्री (सहकार), यांचे स्तरावरुन दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या अ.शा. पत्राने विनंती करण्यात आली आहे.

बँकेने आजपर्यंत विविध माध्यमांतून भारतीय रिझर्व्ह बँक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मान्यतेने ३८,५९४ ठेवीदारांना रु. ५८.९१ कोटी रकमेचे वाटप केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांना प्रलंबित बोनसची रक्कम अदा करणेबाबत**

**(४) * ४८२३ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भात उत्पादक शेतकऱ्यांना शेतकरी खरेदी-विक्री संघाकडून प्रति क्विंटल बोनस म्हणून रु.५००/- देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरबाड (जि.ठाणे) तालुका शेतकरी संघाने सुमारे ५०० भात उत्पादक शेतकऱ्यांचे सन २०२०-२०२१ या कालावधीतील क्विंटलमागे मिळणारे रुपये ५०० इतके बोनसचे पैसे अद्यापही दिले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भात उत्पादक शेतकऱ्यांची प्रलंबित बोनस रक्कम तातडीने अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२०-२१ करिता शासनाकडून प्रत्यक्ष धान खरेदी केलेल्या शेतकऱ्यांसाठी ५० क्विंटलच्या मर्यादेत रु. ७००/- प्रति क्विंटल या दराने प्रोत्साहनपर राशीची रक्कम देण्यात आली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर ५०० शेतकऱ्यांनी सन २०२०-२१ या कालावधीतील खरीप हंगामामध्ये विक्रीसाठी आणलेल्या तथापि, रबी हंगामामध्ये नोंदणी झालेल्या धानासाठी प्रोत्साहनपर राशी वितरीत करण्यात आलेली नाही.

(३) सदर शेतकऱ्यांना प्रलंबित बोनस रक्कम अदा करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील समूह शाळा योजना व शाळा दत्तक योजनांबाबत**

**(५) * २१९३ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाचा १०० दिवसांचा आढावा सादर करताना त्यात समूह शाळा योजना व शाळा दत्तक योजना या योजनेचाही समावेश करण्यात आला असून त्याअंतर्गत ग्रामीण व दुर्गम भागातील शाळेतील २० पेक्षा कमी आणि शहरी भागातील २५ पेक्षा कमी तसेच १० टक्के पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करुन त्या मुलांना शेजारच्या शाळेत समायोजित करण्याचा निर्णय दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शालेय शिक्षण विभागाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद होणार असून समूह शाळा या मुलांच्या निवासापासून दूर असल्याने ग्रामीण व दुर्गम भागातील तसेच ऊसतोड, विटभट्टी इ.स्थलांतरीत कामगार व शेतमजूरांच्या मुलांना हे अत्यंत गैरसोयीचे होणार असून त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयाला विविध स्तरावरुन मोठया प्रमाणात विरोध होत असून अनेक पालक, नागरिक व लोकप्रतिनिधींनी हा निर्णय रद्द करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निर्णयामुळे मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांची संख्या आणखी कमी होणार असून शाळाबाह्य मुलांच्या प्रमाणात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

राज्यातील ० ते २० पट संख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचे शासनाचे कोणतेही धोरण नाही अथवा असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.

राज्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिसेस यांच्या सहयोगाने पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करुन त्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाच्या प्रसारासाठी शाळा दत्तक योजना राबविण्याबाबत दि.१८.०९.२०२३ रोजी शासन निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णय केवळ शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनस्त असलेल्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी लागू आहे. या योजनेमुळे १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा तसेच मराठी शाळा बंद होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांची झालेली दुरवस्था

**(६) * १६३७ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: सांगली, लातूर, परभणी, धाराशिव, नांदेड, बीड व अनेक जिल्ह्यांतील जिल्हापरिषद शाळांमधील वर्ग खोल्या व इमारतींची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बऱ्याच ठिकाणच्या शाळेच्या भिंती, छप्परांची पडझड झाल्याने शाळेतील वर्ग खाजगी जमिनी व पत्र्याच्या शेडमध्ये भरविण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बऱ्याच ठिकाणी सदर वर्गखोल्यांची दुरुस्ती, नवीन वर्ग बांधकाम, इमारत बांधकाम यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याअनुषंगाने काही ठिकाणी निधी उपलब्ध करुन दिला असतानाही सदर कामे सुरु करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व जिल्हापरिषद शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करणे, नवीन वर्ग व इमारत बांधकाम करणे, निधी उपलब्ध करणे, अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण शाळा १६८६ शाळा आहेत. सन २०२३-२४ च्या युडायसच्या माहिती नुसार ५५७७ वर्ग खोल्या चांगल्या आहे, ५९५ वर्गखोल्यांची किरकोळ दुरूस्ती व १०७५ वर्गखोल्यांना मोठया दुरूस्तीची आवश्यकता आहे. १९८ शाळांमध्ये ४७४ वर्गखोल्या धोकादायक आहेत.

लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १२७३ शाळा आहेत. सन २०२३-२४ च्या यूडायस माहितीनुसार २३५ शाळांमधील ६३६ वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून २३१ शाळांमध्ये ५८० वर्गखोल्याचे दुरूस्तीची आवश्यकता आहे.

परभणी जिल्ह्यात जिल्हा परिषेदच्या एकूण शाळा ११२५ आहेत. सन २०२३-२४ च्या युडायस माहितीनुसार ३६९४ वर्ग खोल्या चांगल्या आहे. २९३ वर्गखोल्यांना मोठया दुरूस्तीची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेच्या २८४ शाळांमध्ये ७०१ वर्गखोल्या धोकादायक आहेत.

धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १०८४ शाळा आहेत. सन २०२३-२४ च्या माहितीनुसार ५०७७ वर्गखोल्या चांगल्या आहे. ९३६ वर्ग खोल्याची किरकोळ दुरूस्ती व ८७५ वर्गखोल्यांना मोठया दुरूस्तीची आवश्कता आहे.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २१९६ शाळा आहेत. युडायसच्या माहितीनुसार एकूण ९६० नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. ९८८ शाळामध्ये दुरूस्तीची आवश्यकता आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २४७६ शाळा आहेत. सन २०२३-२४ च्या युडायस माहितीनुसार १०४७९ वर्गखोल्या चांगल्या आहे. ७४९ वर्ग खोल्यांची किरकोळ दुरूस्ती व ८५६ वर्गखोल्याची मोठया दुरूस्तीची आवश्यकता आहे. ३४९ शाळांमध्ये ५९२ वर्गखोल्या धोकादायक आहेत.

(२) जिल्हा परिषद शाळांमधील धोकादायक असलेल्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांचे अध्यापन करण्यात येऊ नये अशा सूचना संबंधित जिल्हा परिषदेनी दिलेल्या आहेत.

(३) जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्गखोल्या दुरूस्तीकरिता व नवीन वर्गखोल्या बांधकामाकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधी शासनाकडे करत असतात.

(४) हे खरे नाही.

(५) शासन व जिल्हा परिषदांकडून सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, वित्त आयोग, आमदार-खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान, शाळा दत्तक योजना या माध्यमांतून इमारतींचे बांधकाम व देखभाल दुरूस्ती केली जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वडाळा, माहीम येथील शिधावाटप कार्यालयांमध्ये धान्याची चोरी होत असल्याबाबत

**(७)** * **६७१२ श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा, माहीम येथील शासनामार्फत पुरवठा करण्यात येत असलेल्या शिधावाटप कार्यालयांमध्ये जीवनावश्यक धान्याची मोठया प्रमाणावर चोरी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधावाटप अधिकारी आणि दुकानदार यांच्या संगनमताने धान्याचा अवैध पद्धतीने व्यापार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धान्याची गुणवत्ता ढासळलेली असून निकृष्ट दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना पुरविले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिधा / जीवनावश्यक वस्तूंचा दर्जा आणि गुणवत्ता राखणेबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत शिधापत्रिका धारकांची बायोमॅट्रीक ओळख पडताळणी करुन ई-पॉस मशीनद्वारे अन्नधान्याचे वाटप करण्यात येत असल्याने, धान्याचा अपहार करणे शक्य नाही. सदर धान्याची गुणवत्ता चांगली असून, तो सर्वसाधारण प्रतीचा (FAQ) असल्याची खात्री केल्यानंतरच भारतीय खाद्य महामंडळाच्या गोदामातून उचल करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रियेत झालेला गैरप्रकार

**(८) * ६१२२ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हापरिषदेत अनुकंपा तत्वावर शिक्षण भरतीमध्ये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची चौकशी करण्याच्या तक्रारी नागरिकांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) यवतमाळ जिल्हा परिषदेत अनुकंपा नियुक्ती व इतर प्रकरणांबाबत दाखल प्रस्तावांच्या अनुषंगाने अनियमितता झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त आहेत.

(३) खाजगी शाळांतील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वारसांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भातील कार्यवाही दिनांक ३१.१२.२००२ च्या शासन निर्णयान्वये केली जाते. अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनपत्र दिनांक १४.०९.२०२२ रोजी आवश्यक त्या सूचना क्षेत्रीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचे सुधारित धोरण तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा व इतर विषयांबाबतचे प्रलंबित प्रस्तावांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सुधारित अहवाल क्षेत्रीय विभागप्रमुखांना प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## बीड जिल्ह्यातील समग्र शिक्षा अंतर्गत बोगस हजेरीपटाच्या आधारे बेकायदेशीररित्या अनुदान प्राप्त केलेल्या संस्थांवर कार्यवाही करणेबाबत

**(९) * ३६१९ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सुमारे ८ लाख ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी समग्र शिक्षा अंतर्गत २२० हंगामी वसतिगृह शासनाच्यावतीने सुरू केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवनी संस्थेने ११ साखर कारखान्यांना भेटी देऊन सुमारे २००० कुटुंबांची तपासणी केली असता ० ते १८ वयोगटातील १८३९ मुले कोल्हापूर जिल्ह्यात त्यांच्या पालकांसोबत असतानाही त्यांची बीड जिल्ह्यात हजेरीपटावर उपस्थिती दर्शविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवनी संस्थेने पाठविलेल्या यादीतील मुलांच्या शाळेत जाऊन तपासणी करण्यात आल्यावर बीड

तालुक्यातील २ व शहरातील १ अशा ३ शाळांना राजश्री छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान व जागर प्रतिष्ठान यांच्या प्रतिनिधीच्या तपासणी पथकाने तपासणी केल्यावर सदरहू बोगस हजेरीपट प्रकरण निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुले वसतिगृहात नसतानाही बोगस हजेरीपटाच्या आधारे अनेक संस्थांनी शासनाचे अनुदान बेकायदेशीररित्या प्राप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बीड जिल्ह्यात १९६ हंगामी वसतिगृहे माहे नोव्हेंबर ते मार्च, २०२५ या कालावधीत सुरु आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) राजश्री शाहू महाराज प्रतिष्ठान व जागर प्रतिष्ठान यांच्या प्रतिनिधींनी ०३ ठिकाणी केलेल्या तपासणीमध्ये, बीड शहरातील ०१ खाजगी माध्यमिक शाळा व ग्रामीण भागातील ०२ जिल्हा परिषदेच्या शाळांना संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी भेट दिलेल्या पैकी जि.प.कें.प्रा.शा. हिवरापहाडी या ठिकाणी हंगामी वसतिगृह होते, परंतु, हजेरीपटावर उपस्थित दाखविलेला विद्यार्थी हंगामी वसतिगृहाचा लाभार्थी नसल्याने बोगस हजेरीपट कोठेही आढळून आलेले नाही. तसेच उर्वरित दोन ठिकाणी शाळेत हंगामी वसतिगृह ही योजना सुरु नव्हती.

सन २०२४-२५ मध्ये सुरु असलेल्या हंगामी वसतिगृहांची जिल्हास्तरावरील पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत माहे जानेवारी मधील दिनांक ४ व ५ या दोन दिवसात एकाचवेळी तपासणी करण्यात आली असता सदर तपासणीमध्ये आढळून आलेली विद्यार्थी संख्या, बायोमेट्रीक उपस्थिती व प्रशासकीय मान्यतेमध्ये प्रस्तावित विद्यार्थी संख्या यापैकी जी संख्या कमी असेल त्या संख्येनुसारच हंगामी वसतिगृहांना निधी वितरित करण्यात यावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान वितरित करणेबाबत

**(१०) * ६०९२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातबारा उताऱ्यावर "ई-पीक" पेरा न नोंदविलेल्या आधी अपात्र आणि नंतर पात्र ठरविण्यात आलेल्या सुमारे १३००० कांदा उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेले २५ कोटी सानुग्रह अनुदान अद्याप वितरीत करण्यात आले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपसंचालक, पणन यांनी संबंधित कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यासाठीचा प्रस्ताव माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये शासनाकडे पाठविलेला असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना त्वरीत अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(११) * १३१६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या मागण्या दिर्घकाळापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ मिळणे, सेवाज्येष्ठतेनुसार गटविम्याचा लाभ तसेच सातव्या वेतन आयोगाच्या २,३,४,५ या हप्त्याची रक्कम मिळणे, सेवानिवृत्तीवेतन दरमाह मिळणे आणि सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरणाची रक्कम त्वरीत मिळणे, सेवानिवृत्त शिक्षकांची प्रलंबित वैद्यकीय देयके त्वरीत प्रदान करणे तसेच एकस्तर नक्षलग्रस्त भत्ता १५ टक्के त्वरीत प्रदान करावा या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे आहे

(३) व (४) शिक्षकांना निवडश्रेणी लाभ हा निवडश्रेणी लागू झाल्याच्या दिनांकापासून नियमितपणे जिल्हास्तरावरुन देण्यात येतो, सेवाज्येष्ठतेनुसार गटविमाचा लाभ जिल्हास्तरावर अदा करण्यात येत आहे. सातव्या वेतन आयोगाच्या २,३,४ हप्ता सन २०२३-२४ व ऑगस्ट, २०२४ मध्ये सातव्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता अदा करण्यात आला आहे. शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरणासाठी व वैद्यकीय देयकासाठीचा आवश्यक निधी वितरीत करण्यात आला आहे. एकस्तर नक्षलग्रस्त भत्ता पात्र कर्मचाऱ्यांना नियमित वेतनासोबत अदा करण्यात येतो.

-----------------

**राज्यातील इयत्ता बारावीच्या परिक्षा केंद्रांवर सामुहिक कॉपी केल्याबाबत**

**(१२) * ६०५३ श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९ परिक्षा केंद्रांवर बारावी परिक्षेच्या पहिल्याच दिवशी संभाजीनगर २६, पुणे ८, नाशिक ३, नागपूर २, अमरावती २ व मुंबई, कोल्हापूर व कोकण विभाग इ. अनेक ठिकाणी सामुहिक कॉपी केल्याचे प्रकार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांची गंभीर दखल घेऊन परिक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करुन दोषी केंद्रांची मान्यता रद्द करण्याची घोषणा माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती केंद्रांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा निकोप वातावरणात होण्यासाठी राज्यात "कॉपीमुक्त परीक्षा अभियान" राबविण्यात आले आहे. तसेच "कॉपीमुक्त परीक्षा अभियानाचा" समावेश १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात करण्यात आला आहे. याअनुषंगाने अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी फेब्रुवारी, २०२५

मध्ये जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कॉपी प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत व ज्या केंद्रावर कॉपीचे प्रकार घडतील त्या केंद्राची मान्यता रद्द करण्यात येईल अशी घोषणा केली.
(३) व (४)

(१) माध्यमिक शालांत (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा २०२४-२५ मध्ये इयत्ता १० वी च्या ३२ केद्रांवर व इयत्ता १२ वी च्या १०२ केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आली आहेत. तथापि, ज्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आले आहेत त्या परीक्षा केंद्रांना विभागीय मंडळांमार्फत नियमानुसार नोटीस देण्यात येईल.

(२) सद्य:स्थितीत दि.०१.०३.२०२५ पर्यंत परीक्षा केंद्रावर घडलेल्या घटनांबाबत एकुण १४ प्रकरणांमध्ये F.I.R. दाखल करण्यात आले आहे.

(३) उर्वरीत प्रकरणांमध्ये दोषी आढळून आलेल्या व्यक्तिंवर राज्य परीक्षा मंडळामार्फत Maharashtra Prevention of Malpractices Act 1982 अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

(४) इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षांमध्ये जी गैरमार्ग प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत त्या संबंधीत विद्यार्थ्यांची नियमानुसार विभागीय मंडळ स्तरावर चौकशी अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल व चौकशीअंती जे विद्यार्थी दोषी आढळून येतील त्यांचेवर मंडळ शिक्षासूचीनुसार कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राज्य सहकारी बँकेच्या कर्ज वसुलीबाबत**

**(१३)** * **६४८२ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सुमारे रु.११०२४ कोटी आणि राज्य सहकारी बँकेने रु.३०८२ कोटी असे जवळजवळ रु.१४१०७ कोटी कर्जांची रक्कम (एनपीए) दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेरपर्यंत बुडीत खात्यात टाकल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन बुडीत कर्जे वसुलीबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही,

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका त्याचप्रमाणे राज्य सहकारी बँकेची दि.३१.३.२०२४ अखेरची विविध आर्थिक मुद्यांवरील माहिती सहकार आयुक्तालयामार्फत संकलित करण्यात आली आहे. या संकलनानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील येणे कर्जबाकी रुपये ८३७१९.९३ कोटी, अनुत्पादीत कर्जाची एकूण रक्कम रुपये ११०४०.७७ कोटी व या कर्जाचे प्रमाण २५.२७ % असून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडील येणे कर्जबाकी रुपये ३३६८१.७१ कोटी असून अनुत्पादीत कर्जाची एकूण रक्कम रुपये ३०८२.१५ कोटी व या कर्जाचे प्रमाण ९.१५% आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेकडील दि.२.४.२०२४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बँकांकडील कर्ज येणे बाकी असणा-या कर्ज खात्यांची वर्गवारी नियमित (Standard asset), अनियमित (Sub-standard assets), संशयित (Doubtful assets) व बुडीत (Loss assets) या प्रमाणे करावयाची आहे. यामधील अनियमित, संशयित व बुडीत या वर्गवारीतील कर्जखाती अनुत्पादीत कर्जे म्हणून गणली जातात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील तसेच राज्य सहकारी बँकेकडील अनुत्पादीत कर्जाच्या रकमांमध्ये अनियमित (Sub-standard assets), संशयित (Doubtful assets) व बुडीत (Loss assets) या वर्गवारीतील कर्जखात्यांचा समावेश असून या अनुत्पादित कर्जाची वसुली करण्याचे अधिकार बँकेस आहेत.

(२) अनुत्पादीत वर्गवारीतील कर्जखात्याबाबत संबंधीत बँकांच्या स्तरावरुन वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेमधील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके पुरविणेबाबत**

**(१४) * ६०३१ श्री.प्रविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेमधील विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठयपुस्तकांचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालभारतीकडे पाठयपुस्तकांची आगाऊ मागणी नोंदवूनही दरवर्षी पाठयपुस्तकांच्या कमी पुरवठयामुळे अनेक विद्यार्थी पाठयपुस्तकांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाठयपुस्तकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शासनाच्या योजनेचा लाभ गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना वेळीच पाठयपुस्तकांचा पुरवठा करणे, यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच आगामी शैक्षणिक वर्षात विहित वेळेतच विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके पुरविणेबाबत योग्य नियोजन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
समग्र शिक्षा व पीएमश्री योजनेंतर्गत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच, शासन अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तकांचा लाभ देण्यात येतो.
(२) व (३) हे खरे नाही.
ई-बालभारती पोर्टलवर जिल्ह्यांच्या ऑनलाईन मागणीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना बालभारतीकडून पाठयपुस्तकांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार**

**(१५) * ३९३९ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. येथे सन २०१५ ते २०२१ या कालावधीत रकमेचा अपहार, अनियमितता, बोगस कर्ज वाटप प्रकरण यामध्ये सुमारे रु.५१.७० कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात वेळोवेळी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदरहू चौकशी अहवालात ७ मुद्दयांपैकी ४ मुद्यांमध्ये रु. ५०,५८,८७,८८०/- कोटी इतकी रक्कम व वगळलेल्या ३ मुद्यांमध्ये रु. १,११,००,०६८/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित दोषींवर कोणतीच कारवाई होत नसल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली या बँकेमधील कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या दि.१७.९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.डी.टी.छत्रीकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने केलेल्या चौकशीअंती बँकेच्या कामकाजामध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, बँकेने नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना, सहकार कायदा व बँकेचे पोटनियम यांचे उल्लंघन करुन असुरक्षित कर्जवाटप केल्याचे दिनांक १६.०६.२०२३ रोजी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालामध्ये निदर्शनास आले आहे. तसेच चौकशी समितीच्या अहवालामध्ये व कलम ८३ अन्वये चौकशीच्या अहवालामध्ये रु. १,११,००,०६८/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे नमूद करण्यात आलेले नाही.

(४) हे खरे आहे,

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील अपहार-गैरव्यवहार प्रकरणी संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासक नियुक्ती करण्यासंदर्भात मा.श्री. सदाभाऊ खोत, विधानपरिषद सदस्य व मा. श्री. गोपिचंद पडळकर, विधानसभा सदस्य यांचे अनुक्रमे दिनांक २१.०१.२०२५ व दिनांक २२.०१.२०२५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली या बँकेमधील कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या दि.१७.९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.डी.टी.छत्रीकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीचा अहवाल दि.१६.६.२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये अपहार झाल्याचे निष्कर्ष नमूद करण्यात आलेले नाहीत. तथापि, बँकेने नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना, सहकार कायदा व बँकेचे पोटनियम यांचे उल्लंघन करुन असुरक्षित कर्जवाटप केल्याचे चौकशी समितीच्या निदर्शनास आले आहे.

सदर अहवालातील मुद्दयांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये दि. ३.११.२०२३ रोजी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन प्राधिकृत अधिकारी तथा तत्कालीन उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड यांनी कलम ८३ अन्वये चौकशी अहवाल दि.४.३.२०२४ रोजी सादर केला आहे. सदर चौकशीमध्ये बँकेचे संबंधित संचालक आणि अधिकारी यांचेकडून बँकेने नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना, सहकार कायदा व बँकेचे पोटनियम यांचे उल्लंघन करुन असुरक्षित कर्जवाटप केल्याने बँकेस आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

कलम ८३ अन्वये चौकशी अहवालातील मुद्दयांच्या अनुषंगाने बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, यांची दि.३.४.२०२४ रोजीच्या आदेशाने नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर आदेशाविरुध्द सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने शासनाकडे अपिल दाखल केले आहे. सदर अपिलावर दि.३.७.२०२४ रोजी सुनावणी होऊन, कलम ८८ अन्वये चौकशी आदेशाबाबत पुढील सुनावणीपर्यंत "जैसे थे" परिस्थिती ठेवणेचे आदेश तत्कालीन मंत्री, सहकार यांनी दिले आहेत. सदर अपिलाबाबत शासन स्तरावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सहकारी शाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध करून देणेबाबत

**(१६) * ५५१९ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक ११ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय पोषण आहारात अंडा पुलाव तसेच तांदुळाची खीर आणि नाचणीचे सत्व या गोड पदार्थांचा समावेश करण्याचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) राज्यातील सरकारी शाळेतील लाखो विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार अंतर्गत देण्यात येणारा निधी बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मध्यान्न भोजनातून देण्यात येणाऱ्या आहारात कपात करण्यात आली असून त्यात अंडी, नाचणी सत्व हे वगळण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मध्यान्ह भोजनातील सर्व पाककृतीकरिता शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा तसेच ही संपूर्ण योजना स्वतंत्र यंत्रणेकडून राबविण्यात यावी अशी मागणी शिक्षक संघटनेकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सहकारी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरेशा निधीची तरतूद करुन पौष्टिक आहार उपलब्ध करून देणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शासन निर्णय दि.११ जून, २०२४ अन्वये तीन संरचित आहार पद्धतीप्रमाणे पोषण आहाराचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, क्षेत्रिय स्तरावर येणाऱ्या अडचणी विचारात घेता, शासन निर्णय दि.२८ जानेवारी, २०२५ अन्वये १२ पाककृतींच्या स्वरुपात पोषण आहाराचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अंडा पुलाव / गोड खिचडी / नाचणी सत्व या पाककृती पर्यायी स्वरुपात देण्यात आल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहाराच्या मानकानुसार विद्यार्थ्यांना आहाराचा लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने प्रति विद्यार्थी प्रति दिन आहार खर्च निश्चित केलेला आहे. त्यानुषंगाने निधीची तरतूद करण्यात येते.

-----------------

## बहिरवाडी (ता.जि.बीड) येथील भैरवनाथ कृषी निविष्टा संस्थेने केलेल्या निकृष्ट कामाबाबत

**(१७) * ६१५४ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहिरवाडी (ता .जि.बीड) येथे भैरवनाथ कृषी निविष्टा संस्थेला पणन विभागाकडून विविध खरेदीसाठी हमी केंद्र देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या कामकाजाबाबत शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी असतांनाही प्रथम वर्षी संस्थेला "ब" दर्जा देण्याऐवजी "अ" दर्जा देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेच्या हमी केंद्राचे कार्यक्षेत्र बीड तालुका असताना देखील जिल्ह्यातील इतर तालुक्यातून संस्थेने खरेदी केल्याचे दिसून येत आहे, तसेच संस्थेच्या पूर्वीच्या व आजच्या कामकाजाबाबत शेतकऱ्यांकडून नोंदणी, बारदान तसेच मापाबाबत तक्रारी प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थेच्या सन २०२० ते २०२५ या कालावधीत केलेल्या कामकाजाच्या बाबतीत सहकार विभागातील सर्व नियमानुसार स्तरनिहाय चौकशी करुन शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीची व आर्थिक अनियमिततेची

वर्षनिहाय लेखापरीक्षण अहवालनिहाय, आयकरसह सर्व बाबींची चौकशी होवून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
भैरवनाथ कृषी निविष्टा ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची "ब" वर्ग सभासद संस्था आहे.
(३), (४) व (५) होय.
सदर संस्थेविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शासन नियमानुसार चौकशी करणे बाबत जिल्हा पणन अधिकारी, बीड यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना कळविले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कमाल चौक (जि. नागपूर) येथील शिक्षक सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(१८) * ६४०१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कमाल चौक (जि.नागपूर) येथील शिक्षक सहकारी बँकेत सोने तारण ठेवण्याच्या (गोल्डलोनच्या) माध्यमातून सुमारे रु.७४ लाख इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकेत सोने तारणकरिता (गोल्डलोनकरिता) आलेल्या बनावट दागिन्यांची कोणतीही तपासणी न करता सदर दागिने खरे भासवून तपासणी करणारे बँक अधिकारी, कर्मचारी व अन्य १६ ग्राहकांनी सदर आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेच्या वसुलीसह दोषी ग्राहक व संबंधित बँक अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षक सहकारी बँक लि. नागपूर या बँकेच्या पॅनेलवरील अधिकृत नियुक्त सुवर्ण तपासनीस व १५ कर्जदार यांनी बँकेची फसवणूक केल्याचे बँकेच्या निर्दशनास आले आहे.
(२) व (३) बँकेच्या पॅनलवरील अधिकृत सुवर्ण तपासनीस व १५ कर्जदार यांनी बँकेची फसवणूक करुन बँकेचे रु.७९,५३,१४२/- इतक्या रकमेचे आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास आल्याने बँकेच्या मुख्यालयाच्या सुचनेनुसार शाखा व्यवस्थापक कमाल चौक, यांनी पाचपावली पोलिस स्टेशन, नागपूर येथे दि. १५.०२.२०२५ रोजी भा.दं. सं. च्या विविध कलमान्वये FIR क्र. ०१२८ दाखल केला आहे. सदर गुन्हयाची चौकशी पोलिसांमार्फत सुरू आहे. सदर फसवणूक प्रकरणी बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करण्यासंदर्भात कार्यवाही बँक प्रशासनाकडून सुरु करण्यात आली आहे.
सदर बँकेत गोल्डलोन कर्जप्रकरणामध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषगांने बँकेच्या सर्व गोल्डलोनकर्ज प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (३) (क) अन्वये चाचणी लेखापरिक्षण करणेसाठी अपर निबंधक, सहकार आयुक्त, पुणे यांच्या दि.१०.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, नागपूर यांची नियुक्ती केली आहे. चाचणी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पामतेल, मोहरी व सोयाबीन तेलात तसेच खाद्यपदार्थांमध्ये होत असलेली भेसळ रोखण्याबाबत

**(१९) * ९९२ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोहरी व सोयाबीन तेल तसेच जीवनावश्यक वस्तू आणि खाद्यपदार्थांमध्ये मोठया प्रमाणात भेसळ होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे शहरात हानिकारक पामतेल अथवा इतर हलक्या दर्जाचे तेल वापरुन तयार केलेले अन्नपदार्थ पॅकेजिंग करुन विक्री करणारे कारखाने कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यात मुंबई, पुणेसह अनेक ठिकाणी तेल, जीवनावश्यक वस्तु व खाद्यपदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीमुळे नागरिकांना कॅन्सर होण्याच्या प्रमाणात देखील मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त भेसळ रोखणेबाबत तसेच दोषी कारखाने, विक्रेते व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात १ एप्रिल २०२४ ते २८ फेबुवारी २०२५ या कालावधीत विविध अन्नपदार्थांचे एकूण ६२४२ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून एकूण किंमत रु.३०.२७ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयाकडून पुणे शहारामध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत खाद्यतेलाचा वापर करुन तयार करण्यात येणारे अन्पदार्थाचे (उदा. फरसाण व नमकीन इ.) २३ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहे. सदर नमुन्यांपैकी १८ अन्न नमुने हे प्रमाणित, ०४ अन्न नमुन्यांमध्ये खाद्यरंग आढळुन आल्याने ते असुरक्षित घोषित करण्यात आले आहे. उर्वरीत ०१ नमुन्याचा अहवाल प्रलंबित असून असुरक्षित नमुन्याप्रकरणी खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

अन्नपदार्थातील भेसळीमुळे राज्यातील नागरिकांचे आरोग्यास धोका होवू नये म्हणून तसेच जनतेला सुरक्षित व आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत व अन्न पदार्थांची गुणवत्ता अबाधित राहावी याकरिता अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्या खालील नियम व नियमने यांची अमलबजावणी सक्षमपणे करीत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्हयात एकात्मिक अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप होत असल्याबाबत

**(२०) * ५९३० श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्हयात एकात्मिक अन्न सुरक्षा योजनेंतर्गत गरीब व गरजू कुटुंबांना निकृष्ट व खाण्यास अयोग्य सुमारे ३२८८ मे. टन ज्वारीचे वितरण करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्हयासाठी बुलढाणा जिल्हयातील नांदुरा येथील गोदामातून ज्वारीची उचल करण्यात आली असून सदर गोदामात ज्वारीला किड, जाळयांच्या गाठी, अळया तसेच खराब बारदाणे इ. बाबी निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गोदाम व्यवस्थापकाला ज्वारीचा प्रयोगशाळा तपासणी अहवाल देण्याबाबत जिल्हा पुरवठा विभाग, अहिल्यानगर यांनी कळविले असूनही अद्याप अहवाल अप्राप्त असल्याने पुरवठा विभागाने आलेले धान्य पुन्हा गोदाम व्यवस्थापकाकडे पाठवून याबाबत शासनाकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लाभार्थ्यांनी रेशन दुकानातून निकृष्ट ज्वारीचे करण्यात येत असलेले वाटप रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना दर्जेदार ज्वारीचे वाटप करणेसह यातील दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये १८९१ दुकानामधुन २९८२४ क्विंटल ज्वारीचे वितरण करण्यात आले. पैकी एक स्वस्त धान्य दुकानामध्ये २ क्विंटल ज्वारी खराब असल्याचे निदर्शनास आले. सदर दुकानास चांगल्या प्रतीची ज्वारी बदलून देण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याचे ज्वारीचे नियतन बदलुन गव्हाचे नियतन देण्याबाबत शासनास अवगत केले होते. त्याअनुषंगाने शासन पत्र दि.१७.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये चांगल्या प्रतीची ज्वारी उपलब्ध करुन देण्यास जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार चांगल्या प्रतीची ज्वारी उपलब्ध करून देण्यात आली.

(४) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वस्त्रोद्योग कंपन्यांना प्रलंबित अनुदान वितरीत करणेबाबत

**(२१) * १८५९ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वस्त्रोद्योग कंपन्यांचे गत अनेक वर्षाचे अंदाजे रु. ३००० कोटी इतके अनुदान प्रलंबित राहिल्यामुळे अनेक कंपन्या बंद पडल्या असून काही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच वस्त्रोद्योग कंपन्यांचे कोरोना काळात देखील मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे या सुतगिरण्या आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुतगिरण्या पूर्ववत चालू होण्याकरिता शासनानाकडून तातडीने अनुदान मिळावे अशी मागणी सुत गिरण्यांच्या व्यवस्थापनाकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वस्त्रोद्योग कंपन्या बंद होऊ नये यासाठी प्रलंबित अनुदान तातडीने वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे :** (१) राज्य शासनाकडून माहे एप्रिल, २०१५ ते दि.२०.०१.२०२५ पर्यंत राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना व्याज अनुदान तसेच भांडवली अनुदान स्वरुपात सुमारे रु.२०५९६१.९८ लाख इतके अनुदान मंजूर करुन

वितरीत करण्यात आले आहे. वस्त्रोद्योग कंपन्या बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबतचे निवेदन वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या कार्यालयास किंवा शासनास प्राप्त नाही.
(२) वस्त्रोद्योग कंपन्यांनी अशी बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली नाही.
(३) सुतगिरण्यांच्या व्यवस्थापनाकडून असे कोणतेही निवेदन वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या कार्यालयास प्राप्त नाही.
(४) शासनाने दि.०२.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर केले आहे. सदर धोरणांतर्गत राज्यातील सर्व वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान, वीजदर अनुदान, सौर ऊर्जेकरिता भांडवली अनुदान तसेच आधुनिकीकरणासाठी भांडवली अनुदान देण्याच्या योजना राबविण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाकडून उपलब्ध निधीनुसार राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना अनुदान वितरीत करण्यात येते.
(५) लागू नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील विद्यार्थीनींना मानव विकास योजनेंतर्गत अनुदान देणेबाबत

**(२२)** * **६००० डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात शाळेपासून सहा किमी अंतरापर्यंतच्या विद्यार्थीनींना शाळेत येण्यासाठी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील १८२ शाळेतील ५८११ विद्यार्थिनींना मानव विकास योजनेंतर्गत सायकल देण्याचे प्रस्तावित करुन रुपये २ कोटी ९० लाख ५५ हजार इतका निधी शिक्षण विभागाकडे वर्ग करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांच्या मानधनासाठी उक्त योजनेचे तब्बल रुपये ५० लाख इतकी रक्कम तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या परवानगीने वापरल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रथमसत्र संपल्यानंतरही शिक्षण विभागाच्या उदासीनतेमुळे उक्त योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२५ अखेर अनेक विद्यार्थीनींच्या खात्यावर अनुदान वर्ग करण्यात न आल्याने सदर विद्यार्थीनींना पायपीट करत शाळा गाठावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी उक्त प्रकरणी उपसंचालकांकडे अहवाल पाठविला असून दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मानव विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना प्राप्त झालेला निधी पात्र लाभार्थी विद्यार्थीनींच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.

तथापि, मानव विकास कार्यक्रम सन २०२२-२३ अंतर्गत सायकल वाटप योजनेच्या अंमलबजावणीमध्ये झालेल्या दिरंगाईबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा मानव विकास समिती, परभणी यांनी विलंब झाल्याने आयुक्त (शिक्षण) यांना सबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कळविलेले आहे.

(५) त्यानुसार, संबंधित शिक्षणाधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यातील सेवानिवृत्त कामगारांची थकीत देणी देणेबाबत

**(२३) * ६०३८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यातील ५०० सेवानिवृत्त कामगारांची अनेक वर्षांपासूनची सुमारे रुपये ५० कोटी इतकी देणी थकीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखाना व्यवस्थापनाकडे वारंवार मागणी करुनही याकामी जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकीत देणींमुळे सेवानिवृत्त कामगारांना आरोग्य विषयक व अन्य बाबींसाठी आर्थिक अडचणींचा मोठया प्रमाणावर सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्त कामगारांची थकीत देणी तातडीने देणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) कारखान्याच्या दि.३१/०३/२०२४ रोजीच्या ताळेबंदानुसार कामगारांची रूपये २३७९.४३ लाख पगार व इतर देणी देय आहेत. तसेच सेवानिवृत्त झालेल्या कामगारांची रजेचे रोखीकरण, ग्रुप ग्रॅच्युईटी व नियमानुसार अन्य देय रक्कमांची कारखान्याने ताळेबंदात तरतुद केल्याचे निदर्शनास येत नाही.
(२), (३) व (४) सन २०१४-२०१५, २०१६-२०१७, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या कालावधीत कारखान्याचा गाळप हंगाम बंद होता. सन २०२२-२०२३ मध्ये दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने SARFAESI ॲक्टनुसार श्री.साईप्रिया शुगर्स लि. (एम.आर.एन भीमा शुगर ॲन्ड पावर प्रा.लि.) हिप्पागिरी मलगुर ता.जमखंडी जि. (कर्नाटक) या कंपनीला २५ वर्षांसाठी भाडेतत्वावर चालविण्यासाठी दिलेला आहे.

कारखान्याने सन २०१५ पासून पूर्ण कार्यक्षमतेने गाळप न केल्यामुळे कारखान्याचे आर्थिक नुकसान होत गेले. तसेच वेळोवेळी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे वित्तीय संस्थांचे कर्जावरील व्याज व इतर खर्च भागविता आलेला नाही.

वित्तीय संस्था/बँकांकडून घेतलेले कर्ज खाती एन.पी.ए झालेली असल्याने त्या कर्जावरील व्याजाची रक्कम, तसेच कर्मचारी पगार, मजुरी खर्च, बोनस खर्च, ऊस तोडणी व वाहतूक खर्च, भीमा सर्व सेवा संघाचे बँक कर्ज व त्यावरील व्याज देणे थकीत झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने २५ वर्षांसाठी भाडेतत्वावर चालविण्यासाठी दिलेला आहे.

कामगारांची देणी कारखाना स्तरावरील असल्यामुळे कारखान्यांना कामगारांची थकीत देणी देणेबाबत सूचना साखर आयुक्त स्तरावरून देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या विविध शाखांच्या परिक्षांचे पुनर्मूल्यांकन शुल्क कमी करण्याबाबत

**(२४) * २३९९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातर्फे सन २०२१-२०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या कला, वाणिज्य, विधी, विज्ञान तंत्रज्ञान, विद्या शाखेच्या परिक्षांच्या पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांनी जवळपास रु.०८,०८, ४५५ एवढे शुल्क विद्यापीठाला भरले

असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून रुपये २५० इतके तर एका विषयाच्या उत्तर पत्रिकांच्या छायाप्रतींसाठी रुपये ५० इतके व छायाप्रतींसाठी रूपये २५ इतके तसेच गरज असल्यास शिक्षकांना प्रवास भत्ता ही द्यावा लागत असल्याने त्याचा आर्थिक बोजाही विद्यार्थ्यांवर पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुसंख्य विद्यार्थी हे पुनर्मूल्यांकनानंतर उत्तीर्ण होत असल्याने विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुनर्मूल्यांकन शुल्क कमी करण्याबाबत आणि उत्तर पत्रिका तपासताना काळजीपूर्वक तसेच जबाबदारीने तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याकडून २५० रुपये तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये आणि एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छाया प्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये एवढे शुल्क आकारण्यात येते. उत्तरपत्रिकांची तपासणी OSM (On screen Marking) पद्धतीने होत असल्याने यासाठी शिक्षकांना प्रवासभत्ता देण्यात येत नाही. त्यामुळे, विहित शुल्काशिवाय शिक्षकांच्या प्रवासभत्त्याचा आर्थिक बोजा विद्यार्थ्यांवर पडत नाही.
(३) हे खरे नाही,
उत्तरपत्रिकांची तपासणी OSM (On screen Marking) पद्धतीने होते. प्रथम मुल्यांकन व पुनर्मूल्यांकन यासाठी वेगवेगळे शिक्षक असल्या कारणास्तव स्वाभाविकरित्या थोड्याफार प्रमाणे गुण वाढ/ घट होते. ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ होऊन उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुण प्राप्त झाले तरच असे विद्यार्थी उत्तीर्ण होतात.
(४) मुंबई विद्यापीठामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ पर्यंत पुनर्मूल्यांकनाचे शुल्क सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये ५०० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये २५० होते. पुढे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाने सदर शुल्क निम्म्यापर्यंत म्हणजेच सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये २५० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये १२५ केले आहेत. तसेच, विद्यापीठाकडून शिक्षकांना उत्तर पत्रिका काळजीपूर्वक तसेच जबाबदारीने तपासण्याबाबतच्या सूचना देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील फडके रोड येथे 'फिनशार्प सहकारी' या नावाने बनावट बँक सुरु केल्याबाबत

**(२५) * ६०५४ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील फडके रोड येथे सुरु करण्यात आलेल्या 'फिनशार्प सहकारी' बँकेची कागदपत्रे व मान्यता अवैध असल्याची तक्रार सहकार उपनिबंधक नागरी बँक यांनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकेतील खातेदारांच्या ठेवी धोक्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेच्या संचालक मंडळाविरुध्द राज्य बँकेचे प्रशासक, श्री.विद्याधर अनास्कर यांनी बँकेच्या कागदपत्रांची व इतर मान्यतांची चौकशी करणेबाबत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन खातेदारांच्या ठेवींचे संरक्षण करणेसह दोषींविरुध्द कारवाई करण्याचा दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) डोंबिवली पूर्व भागामध्ये "फिनशार्प सहकारी बँक" या नावाने जय श्रीराम कृपा, शॉप नं २१/२ आगरकर रोड, डोंबिवली पूर्व या पत्यावर बनावट बँक सुरु झाल्याबाबत श्री. विद्याधर अनास्कर, एम.एस.सी. बँकेचे प्रशासक यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजी पोलिस अधिक्षक, ठाणे व सहकार आयुक्त यांना तक्रार दाखल केली आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांनी सदर जागी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता बँकेचे व्यवस्थापकीय संचालक यांनी बँकेने कोणतेही बँकिंग व्यवहार व अन्य सेवा सुरु केले नसल्याचे सांगितले.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांनी दि.०५/०२/२०२५ व दिनांक ०६/०२/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन दि. ०७.०२.२०२५ रोजी सहकार आयुक्त कार्यालयास अहवाल सादर केला आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४५ (१) चे स्पष्ट उल्लंघन झाल्याने बँकेच्या चार संचालकांना उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांनी दि. १४.०२.२०२५ रोजी नोटीस बजावली असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

यासंदर्भातील उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांचा अहवाल पुढील कार्यवाहीकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेस दि. १२.०२.२०२५ रोजी पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील 'के. एल. पोंदा' हायस्कूलमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या धान्यात झालेला गैरव्यवहार

**(२६) * ६०५६ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील प्रसिध्द 'के. एल. पोंदा' हायस्कूलमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या धान्यामधून विद्यार्थ्यांना कमी धान्याचा आहार देऊन ८०० किलोपेक्षा जास्त धान्याचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोज ७० ते ८० किलो धान्य विद्यार्थ्यांना शिजवून देणे अपेक्षित असताना केवळ ३० ते ४० किलो तांदूळ शिजवला जात असल्याचे अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शाळेचे मुख्याध्यापकांना बजावण्यात आलेल्या नोटीसीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू धान्य पुरवठा जळगाव येथील साई फेडरेशन या संस्थेमार्फत करण्यात येत असून या संस्थेकडून अन्य कोणकोणत्या विद्यालयांमध्ये धान्य पुरवठा करण्यात येतो याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थ व पालकांनी शासनाकडे केली असता त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यालयांमध्ये पुरेसा व दर्जेदार आहार पुरविणेसह यातील दोषी पुरवठा कंत्राटदार व संस्था तसेच संबंधित विद्यालय यांचेविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत के.एल.पोंदा हायस्कूल डहाणू, जि. पालघर या शाळेच्या तांदूळसाठा नोंदवही तपासणीमध्ये नमूद केलेला तांदूळ साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळून आली आहे. त्यानुषंगाने नियुक्त केलेल्या जिल्हास्तरीय चौकशी समितीच्या अहवालानुसार दि.१३ मार्च, २०२५ रोजी संबंधित मुख्याध्यापक यांना

कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर कारणे दाखवा नोटीसीवर दि.१८ मार्च, २०२५ पर्यंत खुलासा सादर करण्याचे निर्देश संबंधित मुख्याध्यापकांना दिलेले आहेत.

(४) हे खरे नाही.

सदरप्रमाणे चौकशी करण्याची मागणी प्राप्त नाही.

(५) व (६) चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.